**पान १ वरून**

## भांबुर्डा येथील बोगस संस्थेच्या नावाने भूखंड लाटला

विमुक्तांसाठी गृहनिर्माण संस्था करण्याचे भासवून भूखंड लाटला. यामध्ये म्हाडाचे पदाधिकारी, अधिकारी व राजकीय नेते मंडळींच्या वरदहस्ताने अस्तित्वात नसलेल्या संस्थेला भूखंड देण्यात आले.

**पुणे शहरातील जिव्हाळ्याचा भूखंड घोटाळा!**

शासकीय कामकाजामध्ये अथवा कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास त्यासाठी रीतसर नोंदणीकृत संस्था असणे गरजेचे असते. संस्था नोंदणी नसताना सदर संस्थेत बत्तीस हजार चौरस फुटाचा भूखंड २००६ साली पुणे गृहनिर्माण म्हाडाने दिला. व सदर संस्थेची नोंदणी ही २००९ साली होते. सर्वसामान्यांना व वेगवेगळ्या क्षेत्रातील म्हाडाच्या भूखंडाचा अथवा सदनिकांचा लाभ घेण्यासाठी अनेक कठोर कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागते परंतु या ठिकाणी सर्वे नंबर ९९ जिव्हाळा सहकारी गृहनिर्माण संस्था गोखलेनगर येथील भूखंड कोणताही नोंदणीकृत संस्था नसताना त्याचबरोबर सदर संस्थेमध्ये जे लाभधारक दाखवण्यात आले . ते बोगस असल्याचे माहिती अधिकारात उघड झाले आहे. सदर संस्थेमध्ये श्रीरामपूर, नगरचे माजी आमदार दिवंगत जयंत ससाणे प्रवर्तक पद घेऊन त्यामध्ये लाभार्थ्यांच्या यादीत दिवंगत नाव असल्याचे दिसून येत आहे. सर्वसामान्यांच्या वाट्याचा आमदार साहेब लाभार्थी म्हणून लाभ कसे घेऊ शकतात हा प्रश्न पडतो. सदर प्रकरण २००६ ते २००९ दरम्यानचे असून या ठिकाणी होत असलेल्या बेसुमार वृक्षतोडीबाबत तक्रार देणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण प्रेमी समीर निकम यांनी माहिती अधिकारात मागवलेल्या माहितीतून सदर धक्कादायक बाबी समोर आले आहे.

## घरगुती गॅससिलेंडरमधुन अवैधरित्या गॅसचोरी करणाऱ्यांवर कारवाई

फाटा, मांजरी)) प्रविण बंगाली रामकुमार ( वय-३५ वर्षे) असे सांगितले. वरील आरोपींची त्यांच्या ताब्यातील पॅगो टॅम्पोतुन घरगुती सिलेंडर गॅसमधुन त्यांचेकडे विशेष तयार केलेला दोन्ही बाजुला रेग्युलटरचा वापर करुन एका टाकीतुन दुसऱ्या टाकीत गॅस भरताना गॅस सारखाज्वलनशिल व स्फोटक पदार्थ मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल असे, स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीत घरगुती गॅस विशेष पाईपच्या साहाय्याने गॅस टाकीमध्ये गॅस ट्रान्सफर करताना एकुण दोन लाख ३६ हजार ५९०/-रु.कि.च्या मुद्देमालासह मिळून आल्याने त्यांचे विरुध्द वानवडी पोलीस ठाणे येथे अत्यावश्यक वस्तू अधिनियम कलम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. हि कारवाई परिमंडळ पाच पोलीस उप-आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहा. पोलीस आयुक्त वानवडी विभाग,वरीष्ठ पोलीस निरीक्षक धन्यकुमार गोडसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सत्यजित आदमाने, विजयकुमार डोके, सुचना व मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार दया शेगर, महेश गाढवे, अमोल पिलाणे, अतुल गायकवाड, अभिजित चव्हाण, गोपाळ मदने, यतीन भोसले, विष्णु सुतार, बालाजी वाघमारे, अमोल गायकवाड, आर्शद सय्यद, विठ्ठल चोरमले, आशिष कांबळे या विशेष पथकाने केली.

## पीएसआय परीक्षेत मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेली अश्विनी केदारीचा दुर्दैवी मृत्यू

डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्या उपचारासाठी समाजातील अनेकांनी मदतीचा हात दिला. मात्र अनेक दिवस मृत्यूशी झुंज देऊन अखेर उपचारादरम्यानच तिची प्राणज्योत मालवली. शेतकरी कुटुंबातून येत कठोर परिश्रमांच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत यश मिळवणाऱ्या अश्विनीच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शोककळा पसरली आहे. तिची जिद्द, मेहनत आणि यशाचा प्रवास आगामी पिढीतील स्पर्धा परीक्षार्थींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## 'पुणे पत्रकार'च्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

करण्यात आली. विश्वस्तपदी सामना चे विठ्ठल जाधव, सार्वमत चे राजेंद्र पाटील, प्रभात च्या अंजली खमितकर तसेच पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष सकाळ चे ब्रीजमोहन पाटील यांची यापूर्वीच पदसिद्ध विश्वस्त म्हणून निवड झाली होती.

## डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी पुलाच्या कामासाठी भिडे पूल वाहतुकीसाठी बंद

स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी पुलाचे काम सुरू असताना गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भिडे पूल वाहतुकीसाठी खुला ठेवण्यात आला होता. हा पूल मुळा नदीवरील भिडे पुलाच्या वर बांधण्यात येत असून, नारायण पेठ, शनिवार पेठ आणि लक्ष्मी रस्ता परिसरातील नागरिक व विद्यार्थी यांना डेक्कन मेट्रो स्थानक गाठणे या पुलामुळे अधिक सोपे होणार आहे. या पुलाचे काम बुधवार, १० सप्टेंबरपासून पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भिडे पूल मंगळवार, ९ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपासून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येईल. नदी पात्रातील रस्ता मात्र नेहमीप्रमाणे खुला असेल. भिडे पूल बंद असताना नागरिकांनी लकडी पूल, बालगंधर्व पूल व झेड ब्रिज या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पुणे मेट्रो तर्फे करण्यात आले आहे. डेक्कन जिमखाना स्थानकाला जोडणाऱ्या पादचारी पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भिडे पूल बंद राहिल्यामुळे पुणेकरांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल पुणे मेट्रोने दिलगिरी व्यक्त केली आहे.

## मनोरुग्णालयात व्यसनमुक्ती केंद्र लालफितीत

पडण्याची शक्यता आहे.

**खर्च टाळण्यास मदत!**

व्यसनाधीनतेमुळे कमी वयात युवकांना अनेक आजार होत आहेत. यामध्ये तोंडाचा कर्करोग, पोटाच्या तक्रारी, विस्मरण, गर्भवतीमाता व नवजात बालकांमध्येही दुष्परिणाम दिसून येतात. व्यसनमुक्ती केंद्र झाल्यास दारु, तंबाखुजन्य पदार्थांच्या व्यसनामुळे रुग्णांवर करावा लागणारा सरकारचा खर्च टाळण्यास मदत होइल. युवक व शेतकऱ्यांना शारिरीक व मानसिकदृष्ट्या सुदृढ ठेवता येईल. समाजातील युवा वर्गाला व्यसनमुक्तीमुळे आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या चांगली दिशा देता येईल.

## स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ मध्ये पुण्याला देशात दहावा क्रमांक

सहकार्यामुळे आणि विविध उपाययोजनांमुळे हे यश मिळाले आहे. स्वच्छ वायू सर्वेक्षणात शहराने झेप घेतल्याचा आनंद असून हे यश नागरिकांच्या जाणीवपूर्वक सहभागामुळे शक्य झाले. पुणे शहराने घेतलेली ही झेप पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाची ठरेल, असेही महापालिका प्रशासनाचे मत आहे.

# लोक अदालतीत सवलतीने वाहतूक दंड भरण्याची संधी

**मुंबई । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.




राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान १२,६५५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून ७ लाख ४०७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून २३६ शिबिरांतून एकूण १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून ७.४ लाखांहून अधिक नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करता आली.

तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना पुढील मोफत उपचार दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

**खालील वाहतूक नियमभंगांचा दंड भरता येईल सवलतीत**

१) विनाहेल्मेट दुचाकी चालविणे
२) सीटबेल्ट न लावता चारचाकी चालविणे
३) सिग्नल तोडणे
४) वेगमर्यादा ओलांडणे
५) चुकीचे पार्किंग
६) वाहन चालविताना मोबाइलचा वापर
७) विनापरवाना, विना पीयूसी वाहन चालविणे
८) फिटनेस प्रमाणपत्र नसणे
९) चुकीच्या लेनमध्ये वाहन चालविणे
१०) नंबरप्लेट नसणे

**खालील वाहतूक नियमभंगांचा दंड माफ होणार नाही**
**मद्यपान करून वाहन चालविणे**

१) अपघात करून पळ काढणे
२) निष्काळजीपणे वाहन चालवून प्राणांतिक अपघातास कारणीभूत होणे
३) अल्पवयीन मुलाने वाहन चालविणे
४) अनधिकृत शर्यत
५) गुन्ह्यांसाठी वाहनांचा वापर
६) न्यायालयात सुनावणी प्रलंबित असलेली प्रकरणे
७) अन्य राज्यातील वाहतूक नियमभंगांची चलने

## 'श्री गणेशा आरोग्याचा' उपक्रमातून ७.४ लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी; १६,७९८ नागरिकांनी केले रक्तदान

**मुंबई । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.

राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान १२,६५५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून ७ लाख ४०७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून २३६ शिबिरांतून एकूण १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून ७.४ लाखांहून अधिक नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करता आली.

**२८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान**

| | |
|---|---|
| एकूण आरोग्य शिबिरे | : १२,६५५ |
| एकूण लाभार्थी रुग्ण | : ७,०४,०७३ |
| एकूण पुरुष लाभार्थी | : ३,१३,५०८ |
| एकूण महिला लाभार्थी | : ३,०५,०३४ |
| लहान बालक लाभार्थी | : ८५,५०८ |
| संदर्भित रुग्ण (उपचारासाठी पाठवलेले) | : १८,८०० |
| एकूण रक्तदान शिबिरे | : २३६ |
| एकूण रक्तदाते | : १६,७९८ |

**जिल्हानिहाय सर्वाधिक योगदान**

| | |
|---|---|
| सर्वाधिक शिबिरे | : पुणे – २५२५ |
| सर्वाधिक रुग्ण तपासणी | : पुणे – १,६५,७१८ |
| सर्वाधिक संदर्भित रुग्ण | : पुणे – ३,६१३ |
| सर्वाधिक रक्तसंकलन | : कोल्हापूर – ४,५०४ |
| बालकांचा सर्वाधिक सहभाग | : पुणे – २०,७८१ |

# राज्याच्या युवा धोरण समितीवर युवा आमदार अमित गोरखे यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती

**पिंपरी। प्रतिनिधी**

राज्याच्या युवा धोरणाच्या आराखड्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीवर पिंपरी-चिंचवडचे युवा आमदार अमित गोरखे यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

''ही समिती मा. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करते.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे युवा पिढीच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल.

युवकांचे शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, उद्योजकता, क्रीडा, कला, संस्कृती आणि सामाजिक सहभाग यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर हे धोरण लक्ष केंद्रित करणार आहे.



युवकांना योग्य संधी उपलब्ध करून देणे, त्यांचे प्रश्न समजून घेणे आणि त्यांच्या स्वप्नांना बळ देणारे दूरदृष्टीचे धोरण तयार करणे हा या समितीचा मुख्य उद्देश आहे.

यापूर्वीही पिंपरी -चिंचवडचे विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांची प्रतिष्ठित इंडो-चायना युथ फेस्टिवल ,चायना मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली होती. देशातून एका प्रतिनिधीला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळत असते.

याआधीही त्यांच्या अतुलनीय सामाजिक व सार्वजनिक कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. २०११-२०१२ मध्ये केंद्र सरकारचा राष्ट्रीय युवा पुरस्कार तसेच शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्य सरकार कडून शिक्षण रत्न पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत. या नियुक्तीमुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण राज्यातील युवा वर्गात आनंदाचे वातावरण आहे. विविध स्तरांतून त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांचे कार्य युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या नव्या जबाबदारीबद्दल बोलताना आमदार गोरखे म्हणाले, ''राज्यातील युवक हेच आपल्या राज्याचे आणि देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या क्षमतांना वाव देऊन, आकांक्षांना न्याय देणारे धोरण तयार करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. आमचे नेते माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. या समितीच्या माध्यमातून मी ग्रामीण तसेच शहरी भागातील युवकांच्या गरजा आणि अपेक्षा प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करेन.'' आमदार गोरखे यांच्या या नियुक्तीमुळे त्यांच्या योगदानातून युवा धोरणाला एक नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून, विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# ९३.५१ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण; उर्वरित विद्यार्थ्यांच्या पडताळणीसाठी विशेष शिबिरे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील दोन कोटी चार लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपैकी ९३.५१ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण शालेय शिक्षण विभागामार्फत पूर्ण झाले आहे. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे आणि आधार क्रमांकाच्या प्रमाणीकरणाकरीता विभागामार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. आता उर्वरित विद्यार्थ्यांची प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या (आधार)(णखूअख) सहकार्याने विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

राज्यामध्ये इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करुन अशा आधारधारक मुलांची नोंद संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत सरल प्रणालीअंतर्गत करण्यात येते. शिक्षण विभागाकडील विविध लाभाच्या योजनांचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना देण्यासाठी देखील आधार क्रमांक प्रमाणीकरण आवश्यक आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाबाबत शासनाच्या १०० दिवसाच्या कृती कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आला असून विद्यार्थ्यांची आधार पडताळणी करण्याचे काम प्राधान्याने करण्याच्या सूचना क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. शिक्षण विभागाने प्रत्येक गटसाधन केंद्रावर दोन असे एकूण ८१६ आधार संच उपलब्ध करुन दिलेले आहेत. विविध माध्यमाच्या शाळांमधून विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे आणि आवश्यक दुरुस्ती दोन्ही कामे सध्या गटस्तरावर सुरू आहेत. तथापि, आधार प्राधिकरणामार्फत विद्यार्थ्यांच्या आधारकार्डवरील माहितीमध्ये विसंगती आढळून येत असल्यामुळे पडताळणी प्रलंबित राहत आहे. राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांमधून २ कोटी ४ लाख ६३ हजार ३९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत यापैकी १ कोटी ९१ लाख ३५ हजार २९६ विद्यार्थ्यांची नावे आधार प्राधिकरणाकडील माहितीशी जुळत असल्याने वैध ठरली आहेत. उर्वरित पाच लाख २७ हजार ६०२ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाहीत.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५,००० युवक-युवतींना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाची संधी : मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबर रोजी ७५ वा वाढदिवस असून हा दिवस अविस्मरणीय व्हावा यासाठी कौशल्य विभाग रोजगार आणि स्वयंरोजगार सेवा पंधरवडा साजरा करत आहे.

या अनुषंगाने राज्यातल्या सुमारे ७५ हजार युवक आणि युवतींना कौशल्यविषयक प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली आहे. येत्या १७ सप्टेंबर पासून २ ऑक्टोबर पर्यंत हा पंधरवडा सुरु राहणार असून १ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) अभ्यासक्रमांचा शुभारंभ केला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी स्थानिक उद्योगांच्या मागणीनुसार प्रत्येक जिल्ह्यात विविध उपक्रम राबवत आहेत. तर मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनात राज्यातील आयटीआयमध्ये रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध करून देणारे अत्याधुनिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. केवळ शहरी भागातच नाही तर ग्रामीण



भागातही आता अत्याधुनिक अल्पकालीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत.

कौशल्य विकासाद्वारे युवक व युवतींचे सक्षमीकरण हा यामागचा मूळ उद्देश आहे. मात्र अनेकांना नियमित कार्यशाळेत जाऊन वेळेअभावी किंवा इतर कारणास्तव प्रशिक्षण घेण्याची संधी मिळत नाही, अशा होतकरू युवकांना आणि युवतींना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात अल्पकालीन अभ्यासक्रमाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. आयटीआयच्या नियमित वर्गाच्या व्यतिरिक्त इतर उपलब्ध वेळेत हे अभ्यासक्रम घेण्यात येतील.

राज्यातील आयटीआयमध्ये सध्या प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसोबतच अतिशय अल्पदरात युवक आणि युवतींना रोबोटिक, सौर ऊर्जा तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय, व्यक्तिमत्व आणि सामाजिक विकासासंदर्भात अत्याधुनिक अभ्यासक्रम चालवले जाणार आहेत. स्थानिक उद्योग आस्थापनांमध्ये रोजगारासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि प्रशिक्षण त्याच जिल्ह्यात मिळाल्याने तरुणांना आपला जिल्हा सोडून अन्य ठिकाणी रोजगारासाठी जावे लागणार नाही.

उद्योगांना पूरक स्वयंरोजगाराच्या संधी या अल्पकालीन अभ्याक्रमाच्या माध्यमाने तरुणांना उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे सध्या आयटीआयचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींकडून या अभ्यासक्रमांसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येणार आहे. या संकेतस्थळावर राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात सुरु होत असलेल्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती तसेच प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. अल्पकालीन अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर युवकांना रोजगाराच्या संधीबाबत आणि स्वयंरोजगाराची माहितीही संबंधित आयटीआय संस्थेत दिली जाणार आहे. उपलब्ध जागांचा विचार करता प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाणार असून युवक आणि युवतींनी त्वरित या अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करावी, असे आवाहनही मंत्री श्री. लोढा यांनी केले आहे.